**ठळक बातम्या**

- भारत अमेरिका व्यापार कराराबाबत आजही लोकसभेत गदारोळ, विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्या नवी दिल्लीत सेवा तीर्थ आणि कर्तव्यभवनाचं उद्घाटन

- केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला संमिश्र प्रतिसाद

- बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी ७ वाजता

**<><><><><>**

लोकसभेत आज प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर सुरू झालेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्यानंतर लगेच विरोधी पक्ष सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार कराराविरोधात घोषणाबाजी सुरू केली तसंच हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली. या गदारोळातच मंत्री श्रीपाद नाईक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केल्यामुळे गदारोळ वाढत गेला. आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज तहकूब केलं.

त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सादर केलेल्या औद्योगिक संबंध संहिता विधेयकावर चर्चेला सुरुवात झाली.

दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं. राहु ुल गांधी परदेशात जाऊन सोरोस फाऊंडेशन, USAID, फोर्ड फाऊंडेशन अशा संस्थांशी संधान

साधत भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करतात हे आपण आपल्या नोटीशीत सांगितल्याचं दुबे म्हणाले.

**होल्ड बाईट दुबे**

**<><><><><>**

ओदिशामधल्या एका अंगणवाडी केंद्रामधल्या कथित जातीय भेदभावाचा मुद्दा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. देशात सुधारणा आणि प्रगती होत असल्याचा दावा केला जात असताना सामाजिक भेदभावाचा प्रत्यय अशा घटनांमधून सातत्याने येत आहे, असं खरगे म्हणाले. ओदिशामधल्या या अंगणवाडीत दलित महिलेने बनवलेलं अन्न आपल्या मुलांना खायला विशिष्ट समुदायातल्या लोकांनी नकार दिल्याचं वृत्त माध्यमांमधे आलं होतं. मुलांच्या शारीरीक आणि बौद्धिक विकासामधे अंगणवाडीची भूमिका महत्त्वाची असते, तिथेच जर अशाप्रकारचा भेदभाव होत असेल तर याचा मुलांच्या वाढीवर दूरगामी परिणाम होईल, अशी भिती खरगे यांनी व्यक्त केली.

**होल्ड बाईट खरगे**

त्याआधी खासदार एल मुरुगन यानी सार्वजनिक लेखा आणि सार्वजनिक उपक्रम समितीसाठी सात सदस्यांच्या निवडीचा प्रस्ताव सभागृहात मांडला. हा प्रस्ताव आवाजी मतदानाने मंजूर झाला. अनुसूचित जाती आणि जमाती समितीवर दहा सदस्यांच्या निवडीचा प्रस्तावही सभागृहाने मंजूर केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सेवा तीर्थ तसंच कर्तव्यभवन एक आणि दोन यांच्या नामफलकाचे अनावरण करतील अशी माहिती प्रधानमंत्री कार्यालयानं दिली आहे.

प्रधानमंत्री कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा मंडळ सचिवालय आणि मंत्रीमंडळ सचिवालय ही आधी वेगवेगळ्या ठिकाणी असणारी कार्यालये आता सेवातीर्थ या परिसरात एकत्र आहेत. अर्थखाते, संरक्षण मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंबकल्याण, शिक्षण तसेच माहिती आणि प्रसारण मंत्रालय यासारखी काही महत्त्वाची मंत्रालये कर्तव्यभवनमध्ये आहेत.

नामफलक अनावरणाचा कार्यक्रम दुपारी दीड वाजता होईल तर संध्याकाळी सहा वाजता प्रधानमंत्री सेवातीर्थ इथं जनसमूहाला संबोधित करतील.

**<><><><><>**

देशाचा आर्थिक कायापालट घडवण्यासाठी यंदाचा अर्थसंकल्प काय योगदान देईल याचं सर्वसमावेशक चित्र अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी लोकसभेतल्याआपल्या भाषणात रेखाटल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. अर्थसंकल्पावरच्या त्यांच्या लोकसभेतल्या निवेदनावरचा व्हिडिओ समाजमाध्यमावर मोदी यांनी समाईक केला. त्याबद्दल ते बोलत होते. सुधारणा, सूक्ष्म, मध्यम, लघु उद्योगांना पाठबळ, कौशल्य विकास, पायाभूत सुविधांना चालना आणि शिक्षण या विषयांवर सितारामन यांनी भर दिल्याचं मोदी म्हणाले.

<><><><><>

भारत - अमेरिका व्यापार करारामुळे भारताची व्यापारी शिल्लक ९००० कोटी डॉलर्सने वाढेल असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या अहवालात व्यक्त केला आहे. जीडीपीच्या १ पूर्णांक १ दशांश टक्के एवढी ही रक्कम आहे. या करारामुळे परदेशी चलनसाठ्यात तीस लाख डॉलर्सची भर पडेल असा अंदाज आहे.

भारताकडून अमेरिकेला सर्वाधिक निर्यात होणाऱ्या १५ वस्तूंची निर्यात ९कोटी ७० लाख डॉलर्सने वाढवता येईल असा विश्वास भारतीय स्टेट बँकचे मुख्य आर्थिक सल्लागार सौम्य कांती घोष यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वामी दयानंद सरस्वती याना आदरांजली वाहिली आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी समाजाबरोबरच देशाच्या शिक्षण क्षेत्रालाही मौल्यवान मार्गदर्शन केलं असं मुर्मू यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे तर त्यांचे अंधश्रद्धा आणि बुवाबाजी विरोधातले कार्य महत्वाचे आहे असं राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांच्या विरोधात प्रमुख १४ कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला आज देशाच्या विविध भागात अंशतः प्रतिसाद मिळाला. पश्चिम बंगालमधे सर्व शासकीय कार्यालयात नेहमीप्रमाणेच उपस्थिती आहे. परिवहन सेवा सुरळीत आहे, तसंच शाळाही चालू आहेत. जादवपूर आणि इतर विद्यापीठांच्या प्रमुख

दरवाजासमोर Student’s Federation of India च्या विद्यार्थी कार्यकर्त्यांनी बंदच्या पाठिंब्यात निदर्शनं केली. गुजरातमधे बंदचा फारसा परिणाम दिसून येत नसल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे.

झारखंडमधे बँका आणि खाणींच्या कामावर बंदचा परिणाम झाला असल्याचं संपकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितलं.

नवीन कामगार कायदे, बीज विधेयक, वीज सुधारणा विधेयक तसंच अणुऊर्जा विकास विधेयक मागे घ्यावे, विकसित भारत जी राम जी योजनेऐवजी मनरेगाचं पुनरुज्जीवन करावं या आणि इतर मागण्यांसाठी विविध कामगार संघटनांनी एकत्र येऊन आजचा बंद पुकारला आहे. आसाममधे रस्त्यांवर वाहतूक थांबली आहे, बिहारमधे ओदिशामधे संपकऱ्यांनी निदर्शनं केली. ओदिशात बंदमुळे आवश्यक सेवांवर परिणाम होऊन जनजीवन प्रभावित झालं आहे.

काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि आम आदमी पार्टीने बंदला पाठिंबा जाहीर केला आहे.

<><><><>

सागरी किनारपट्टीच्या सुरक्षिततेसाठी प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी हे उद्देश असलेल्या कम्बाईन्ड टास्क फोर्स म्हणजेच CTF 154 च्या नेतृत्वाचा आज भारतीय नौदलाच्या वतीनं कमांडर मिलिंद मोकाशी यांनी औपचारिक स्वीकार केला. याआधी हा मान इटालियन नौदलाकडे होता. हा औपचारिक कार्यक्रम बहारिनच्या मनामा इथल्या CMF मुख्यालयात झाला अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. व्हाईस ॲडमिरल तरुण सोबती तसंच अमेरिकन नौदलाच्या केंद्रीय कमांडचे व्हाईस ॲडमिरल या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

CMF म्हणजेच कम्बाईन्ड मेरिटाईम फोर्सेस हा किनारपट्टी संरक्षणाच्या उद्देशाने एकत्रित आलेल्या ४७ देशांचा समूह आहे. CTF154 हा त्यातील उपक्रमांपैकी एक उपक्रम आहे.

<><><><>

बांगलादेशातल्या तेराव्या संसदीय निवडणुकीत आज सकाळी साडेसात वाजता मतदान सुरू झालं. आज संध्याकाळी साडेचार वाजता मतदान संपेल. २९९ मतदारसंघांसाठी ही निवडणूक होत असून एका मतदारसंघातलं मतदान उमेदवार मरण

पावल्यामुळे स्थगित करण्यात आलं आहे. ४२ हजाराहून अधिक मतदान केंद्रात मतदान सुरू असून १२ कोटी ७७ लाख पात्र मतदार आहेत. आपल्या पक्षाला विजय मिळेल असा विश्वास बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारीक रहमान यांनी व्यक्त केला. ढाका इथं आज सकाळी त्यांनी मतदान केलं. त्यानंतर ते बोलत होते. देशभरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला असून काही ठिकाणी हिंसक घटनांचं वृत्त आहे.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना नामिबियाबरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी ७ वाजता होणार आहे.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर नेपाळ विरुद्ध इटली हा सामना दुपारी सव्वातीनवाजता सुरु होईल.

श्रीलंकेत कोलंबो इथं श्रीलंकेबरोबरच्या सामन्यात ओमानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचं ठरवलं. २० षटकात ५ गडी गमावून श्रीलंकेनं २२५ धावा केल्या/ विजयासाठी २२६ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे.

शेवटची बातमी मिळाली तोपर्यंत ओमानच्या ९ षटकात ३ बाद ५९ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**